नि.दि.दा.क्र.७५/२०१३
ऋख्खड देवस्थान / शैलेंद्र
वादीचा सा.क्र.०१
**नि.क्र. २२**

**<u>वादीतर्फे साक्षीदारचा सरतपास विधीज्ञ श्री.आर.डी.किंदर्ले यांचे मार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** मी पुराव्याचा प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला आहे. सदर मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. मी अभिलेखावर भाडेपत्राची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर तत्कालीन सचिव श्री. देशमुख व प्रतिवादी शैलेंद्र यांची सही आहे. मी तत्कालीन सचिव श्री. गंगाधर देशमुख यांची सही ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येते. देवस्थानामार्फत प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर देवस्थानाचे विधीज्ञ श्री. ठेंगरे यांची सही आहे. त्यास **नि.क्र.२७** देण्यात येते. पोस्टाची पावती व पोचपावती दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२८ व २९** देण्यात येते. त्याचप्रमाणे ऋख्खड आश्रम देवस्थान विश्वस्त मंडळाच्या ठरावाची प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**<u>प्रतिवादीतर्फे उलट तपास विधीज्ञ श्री. एस.एच. तलमले यांचे मार्फत –</u>**

०२. प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ यांचा पुकारा केला असता गैरहजर. अभिलेखावर कोणताही अर्ज सादर नाही. साक्षीदाराचे शपथपत्र हे दिनांक ३०.०९.२०२१ रोजी दाखल झाले आहे. प्रस्तुत प्रकरण हे १० वर्षपेक्षा जुने आहे. त्यामुळे प्रस्तुत दावा सदर साक्षीदाराच्या विनाउलटतपास पुढे चालविण्यात येतो.

श्रवणोत्तर स्विकृत,

(पी. के. मुटकुळे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुही, जि.नागपूर.

दि. १३.११.२०२५.